नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३२/२०२४
निशाणी क्र. २२

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १</u>

**नाव** - शशीकांत बाळासाहेब सदाफळ
**वय** - ५० वर्षे, **व्यवसाय** - नोकरी
**पद** - निमतानदार
**रा.** - राहाता, ता. राहाता, जि. अहमदनगर.

<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ ए.आर.यादव यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>

मी राहाता येथे सन २०२२ पासुन निमतानदार पदावर कार्यरत आहे. प्रस्तुत प्रकरणात मला न्यायालयाद्वारे कोर्ट कमिशन कामी मला आमचे वरिष्ठांनी नियुक्त केले होते व कोर्ट कमिशन बाबतचे पत्र आमचे वरिष्ठांना प्राप्त झाले होते.

२. सदर कोर्ट कमिशनचे आदेशाचे अनुषंगाने सुरुवातीला कार्यालयाने वादींना कागदपत्रे सादर करणे बाबत, चलन भरण्याबाबत पत्र दिले. त्यानंतर वादी अभिषेक दिलीप जपे यांनी ऑनलाईन अर्ज सादर करुन मोजणीची फिस भरली. त्यानंतर कार्यालयाने ऑनलाईन पध्दतीने मोजणीसाठी सदर प्रकरण माझ्याकडे वर्ग करण्यात आले.

३. प्रकरण मोजणीसाठी दि. २१.०२.२०२५ नेमण्यात आला. कार्यालयामार्फत वादी व प्रतिवादी यांना नोटीसा काढण्यात आल्या. त्यानंतर ठरलेल्या दिवशी मी कार्यालयाचे मोजणी कामी आवश्यक असलेले अभिलेख घेऊन मी मोजणीसाठी प्रत्यक्ष जायमोक्यावर गेलो. मोजणीच्या वेळी वादी अभिषेक जपे तसेच प्रतिवादी शरद मुरलीधर जपे, पंच दिलीप दगडू जपे, आकाश किरणे जपे, छाया भारत जपे, बाबासाहेब विष्णु रकताटे, संजय रामभाऊ रकताटे हे लोक हजर होते. मी उपस्थितीत लोकांनी दाखवलेल्या कब्जेवहिवाटीप्रमाणे रोवर मशिनचे सहाय्याने त्या ठिकाणी मोजणीचे काम पुर्ण केले.

४. मोजणीचे काम पुर्ण केल्यानंतर तेथे उपस्थित लोकांच्या जबाब/पंचनाम्यावर सह्या घेतल्या. त्यानंतर कार्यालयीन मुळ अभिलेखाचे आधारे मोजणीचा नकाशा तयार केला आणि पुर्ण प्रकरण कार्यालयात मोजणी नकाशासह सादर केले.

५. प्रस्तुत प्रकरणात कार्यालयाने कमिशन रिपोर्टचा अहवाल सादर केला आहे. नोटीसा, पोस्टाने नोटीसा पाठवल्याचे पावत्या, जबाब/पंचनामा यांचे छायांकित प्रती सादर आहेत. मोजणी नकाशाची ब प्रत सादर केली आहे. आता मला प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणात दाखल असलेली मोजणी नकाशाची ब प्रत दाखवण्यात आल. ती आमच्या कार्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे बरोबर आहे. सदर नकाशावर माझी निमतानदार म्हणुन सही आहे. तसेच मोजणी नकाशा परिक्षण करणार म्हणुन छाननी लिपिक व शिरस्तेदार यांची सही आहे. मोजणी नकाशातील मजकुर सत्य व बरोबर आहे. **त्यास नि.क्र. २३** देण्यात आला.

६. सदर मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता मला असे दिसुन आले की गट क्र. १९६ मधील क्षेत्रामध्ये पोट हिस्सा अथवा फाळणी झालेली नाही. त्यामुळे वादी, प्रतिवादी व इतर धारक यांचे क्षेत्र समजुतीचे टिपामध्ये विविध रंगाने दर्शविलेले आहे. मोजणी नकाशामध्ये वादी अभिषेक यांचे कब्जेवहीवाटीत ६आर क्षेत्र असल्याचे आढळुन आले. सदर व्यक्तीचे सातबा-याप्रमाणे ११आर क्षेत्र इतके आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कब्जेवहीवाटीत ३३आर इतके क्षेत्र असुन प्रत्यक्ष सातबा-याप्रमाणे त्यांचे क्षेत्र ३०आर इतके क्षेत्र आहे. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे कब्जेवहिवाटीत २१आर क्षेत्र असुन सातबा-याप्रमाणे त्यांचे क्षेत्र २०.५०आर क्षेत्र आहे.

७. अभिलेखावर दाखल नोटीसा, पोस्टाने नोटीसा पाठवल्याचे पावत्या, जबाब/पंचनामा यांचे छायांकित प्रती या प्रकरणातील मुळ संचीकेच्या छायांकित प्रती आहेत. मी आजरोजी मुळ संचीका समवेत आणली आहे(नि.क्र. २१ वर पारित आदेशानुसार सहाय्यक अधिक्षक यांचे द्वारा अभिलेखावर दाखल नोटीसा, पोस्टाने नोटीसा पाठवल्याचे पावत्या, जबाब/पंचनामा यांचे छायांकित प्रती मुळ अभिलेखाप्रमाणे प्रमाणित करुन घेतले) सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. २४ ते २६ देण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**
**प्रकरण प्रतिवादी विरुध्द एकतर्फा. सबब, उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
**(पंकज रा. फुलारी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर., राहाता.

राहाता
दिनांक –२७.०१.२०२६